# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

३३५ - २३ दिनांक : - २७/०९/२०२३

**चोरी व मोटार सायकल चोरी करणाऱ्या आरोपीस अटक करुन चोरीच्या ४ मोटार सायकली व रोख रक्कम हस्तगत करुन ५ गुन्हांची उकल नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी.**

दि २१/०९/२०२३ रोजी रात्रौ ००.१५ वा. ते ००.५० वाजताचे दरम्यान नालासोपारा पश्चिमेस, चक्रेश्वर तलाव, गेट नंबर १ येथे फिर्यादी नामे विनोद जयदेव दास, वय २६ वर्षे, रा. रु.नं. डी/२०१, गुलमोहर हेरीटेज, फनफिएस्टा थिएटर जवळ, नालासोपारा पश्चिम, ता. वसई जि. पालघर यांनी त्यांची निळया रंगाची ॲक्टीवा स्कुटर क्रमांक एम एच. ४८, बी.आर.४५२८ ही गणपती विसर्जनाचे वेळी पार्क करुन ठेवलेली असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांची वरील वर्णनाची मोटार स्कुटर चोरी करुन घेवून गेल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नालासोपारा पोलीस ठाणेस गु.र.क्र. I ४४९/२०२३ भा.दं.वि.सं कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

नालासोपारा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये गेल्या काही दिवसांपासुन मोटारसायकल चोऱ्यांचे प्रमाण वाढल्याने वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. गुप्त बातीमदाराकडून मिळालेल्या बातमीच्या आधारे आरोपी नामे सल्लाउद्दीन उर्फ सल्ला हादीश खान, वय २७ वर्षे, रा.रु.नं.सी/२०१, जास्मीन बिल्डींग, बैतुलनसर, नालासोपारा (प), ता.वसई, जि.पालघर यास ताब्यात घेवुन त्याचेकडे विचारपुस केली असता त्याचा वर नमुद गुन्हातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक २२/०९/२०२३ रोजी अटक करण्यात आली. अटक आरोपीताकडे सखोल चौकशी केली असता त्याने नालासोपारा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये मागील काही दिवसामध्ये ४ मोटार सायकल चोरी केल्याचे तपासात उघड झाले. त्याचेकडून गुन्हयात चोरीस गेलेल्या ४ मोटारसायकली हस्तगत करण्यात आलेल्या आहेत. तसेच श्रीप्रस्था येथील एच.पी.पेट्रोल पंपाचे ऑफीस मधून चोरलेली बॅग व रोख रक्कम असा एकूण २,१५,३००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**-उघडकीस आलेले गुन्हे -**

| अनु.क्र | गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम |
|---|---|
| ०१ | ४९९/२०२३, भा.दं.वि.सं.कलम ३७९ अन्वये ( मुळ गुन्हा ) |
| ०२ | ४४४/२०२३, भा.दं.वि.सं.कलम ३७९ अन्वये |
| ०३ | २५६/२०२३, भा.दं.वि.सं.कलम ३७९ अन्वये |
| ०४ | ४५०/२०२३, भा.दं.वि.सं.कलम ३७९ अन्वये |
| ०५ | ४५१/२०२३, भा.दं.वि.सं.कलम ३८० अन्वये |

तसेच सदर आरोपीत हा नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ४४७/२०२२, भादंविस कलम ३७९, ३४, सह प्राण्यांना क्रुरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६० चे कलम ११(१)(घ), (ड), (च) प्रमाणे या गुन्हयात पाहीजे आरोपीत आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, राजेंद्र मोकाशी, सहा. पो.आयुक्त नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली विजयसिंह बागल, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नालासोपारा पोलीस ठाणे, सचिन कोतमिरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि. पंडीत मस्के, अमोल तळेकर, पो.हवा. किशोर धनु, हिरालाल निकुंभ, प्रशांत साळुंके, पो.ना. अमोल तटकरे, पो.अं. कल्याण बाचकर, राजेश नाटुलकर, प्रेम घोडेराव यांनी केलेली आहे.




------ooooooo------